भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन
समारंभ - दि. २६ जानेवारी, २०२५,

# महाराष्ट्र शासन

**शासन परिपत्रक क्र. सीईआर-२०२५/प्र.क्र.०३/राशि-१,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक १८ जानेवारी, २०२५**

**शासन परिपत्रक**

दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी म्हणजे सकाळी ०९-१५ वाजता आयोजित करण्यात यावा. या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे यासाठी या दिवशी सकाळी ८-३० ते १०-०० वा. च्या दरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्धशासकीय समारंभ आयोजित करण्यात येवू नये. जर एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वतःचा ध्वजारोहण समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो समारंभ सकाळी ८-३० वा. च्या पूर्वी किंवा १०.०० वा. च्या नंतर करावा.

२. मा. राज्यपाल महोदय यांच्या हस्ते व मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या उपस्थितीत सकाळी ९-१५ वाजता शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे प्रमुख समारंभामध्ये ध्वजारोहण व समारंभपूर्वक संचलन कार्यक्रम होईल.

३. विभागीय व जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे मा. मंत्री / मा. राज्यमंत्री राष्ट्रध्वजारोहण करतील :-

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | मा. मंत्री / मा. राज्यमंत्री |
|---|---|---|
| १) | ठाणे | श्री. एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे, मा. उपमुख्यमंत्री |
| २) | पुणे | श्री. अजित आशाताई अनंतराव पवार, मा. उपमुख्यमंत्री |
| ३) | नागपूर | श्री. चंद्रशेखर प्रभावती कृष्णराव बावनकुळे |
| ४) | अहिल्यानगर | श्री. राधाकृष्ण सिंधूताई एकनाथराव विखे-पाटील |
| ५) | वाशिम | श्री. हसन सकिना मियालाल मुश्रीफ |
| ६) | सांगली | श्री. चंद्रकांत (दादा) सरस्वती बच्चू पाटील |
| ७) | नाशिक | श्री. गिरीश गिता दत्तात्रय महाजन |
| ८) | पालघर | श्री. गणेश सुभद्रा रामचंद्र नाईक |
| ९) | जळगाव | श्री. गुलाबराव रेवाबाई रघुनाथ पाटील |
| १०) | यवतमाळ | श्री. संजय प्रमीला दुलीचंद राठोड |
| ११) | मुंबई (शहर) | श्री. मंगलप्रभात प्रेमकंवर गुमनमल लोढा |
| १२) | मुंबई (उपनगर) | ॲड. आशिष मिनल बाबाजी शेलार |

| | | |
|---|---|---|
| १३) | रत्नागिरी | श्री. उदय स्वरुपा रविंद्र सामंत |
| १४) | धुळे | श्री. जयकुमार नयनकुवर जितेंद्रसिंह रावल |
| १५) | जालना | श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे |
| १६) | नांदेड | श्री. अतुल लिलावती मोरेश्वर सावे |
| १७) | चंद्रपूर | डॉ. अशोक जनाबाई रामाजी ऊईके |
| १८) | सातारा | श्री. शंभूराज विजयादेवी शिवाजीराव देसाई |
| १९) | बीड | श्री. दत्तात्रय गिरीजाबाई विठोबा भरणे |
| २०) | रायगड | कु. आदिती वरदा सुनिल तटकरे |
| २१) | लातूर | श्री. शिवेंद्रसिंह अरुणाराजे अभयसिंहराजे भोसले |
| २२) | नंदूरबार | श्री. माणिकराव सरस्वती शिवाजी कोकाटे |
| २३) | सोलापूर | श्री. जयकुमार कमल भगवानराव गोरे |
| २४) | हिंगोली | श्री. नरहरी सावित्रीबाई सिताराम झिरवाळ |
| २५) | भंडारा | श्री. संजय सुशीला वामन सावकारे |
| २६) | छत्रपती संभाजीनगर | श्री. संजय शकुंतला पांडुरंग शिरसाट |
| २७) | धाराशिव | श्री. प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक |
| २८) | बुलढाणा | श्री. मकरंद सुमन लक्ष्मणराव जाधव (पाटील) |
| २९) | सिंधुदुर्ग | श्री. नितेश निलम नारायण राणे |
| ३०) | अकोला | श्री. आकाश सुनिता पांडुरंग फुंडकर |
| ३१) | गोंदिया | श्री. बाबासाहेब शांताबाई मोहनराव पाटील |
| ३२) | कोल्हापूर | श्री. प्रकाश सुशिला आनंदराव आबिटकर |
| ३३) | गडचिरोली | ॲड. आशिष उमादेवी नंदकिशोर जयस्वाल |
| ३४) | वर्धा | डॉ. पंकज कांचन राजेश भोयर |
| ३५) | परभणी | श्रीमती मेघना दिपक साकोरे - बोर्डीकर |
| ३६) | अमरावती | श्री. इंद्रनील अनिता मनोहर नाईक |

४. राष्ट्रध्वजारोहण करणारे मा. मंत्री / मा. राज्यमंत्री महोदय काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रमस्थळी उपस्थित राहू न शकल्यास विभागीय मुख्यालयी विभागीय आयुक्तांनी आणि जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकाऱ्यांनी राष्ट्रध्वजारोहण करावे. इतर विभागीय व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी अनुक्रमे संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी ध्वजारोहण करतील. ध्वजवंदनाचा कार्यक्रम सुरळीतपणे पार पडेल याची दक्षता घ्यावी. तसेच, संबंधित प्रांत अधिकारी व तहसिलदार हे अनुक्रमे जिल्हा उपविभागीय व तालुका मुख्यालयी ध्वजारोहण समारंभाच्या ठिकाणी शासकीय कार्यक्रमांचे अध्यक्षस्थान स्विकारतील. महाराष्ट्र राज्यामध्ये वरील दिवशी सर्व शासकीय व सार्वजनिक इमारतींवर, किल्ल्यांवर, तसेच जिल्ह्यांमध्ये ऐतिहासिक महत्वाच्या ठिकाणी राष्ट्रध्वज उभारण्यात यावेत.

**५.** राष्ट्रध्वजाला वंदन करताना **"राष्ट्रगीत"** म्हणण्यात यावे/वाजविण्यात यावे व त्यानंतर लगेचच सावधान स्थितीत येऊन **"राज्यगीत"** वाजविण्यात यावे. ध्वजारोहण समारंभ अध्यक्षस्थान स्विकारणाऱ्या मान्यवरांनी / अधिकाऱ्यांनी अशा प्रसंगी भाषण करावे किंवा नाही हे स्वत: ठरवावे. सलामीच्या वेळी सज्ज असलेला बँन्ड सलामीपूर्वी व सलामीनंतर वाजविण्यास हरकत नसावी.

**६.** राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पद्धतीबाबत शासन परिपत्रक क्रमांक एफएलजी-१०९१/३०, दिनांक २ मार्च, १९९१ तसेच क्रमांक एफएलजी-१०९१/(२)/३०, दिनांक ५ डिसेंबर, १९९१ तसेच क्रमांक एफएलजी-१०९८/(ध्वजसंहिता)/३०, दिनांक ११ मार्च, १९९८ अन्वये दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. ध्वजारोहणाची रंगीत तालीम घेतली जाईल याची दक्षता घेण्याबाबत सर्व संबंधितांना सूचना द्याव्यात. राष्ट्रध्वज सुस्थितीत असल्याबाबत व सूर्यास्तास उतरवला जाईल याचीही दक्षता घेण्यात यावी.

**७.** प्रजासत्ताक दिनाच्या समारंभाला सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित रहातील याची दक्षता घ्यावी.

**८.** उत्सव अथवा औपचारिक प्रसंगी परिधान करावयाचा राष्ट्रीय पोषाख प्रजासत्ताक दिन समारंभ प्रसंगी उपस्थित रहाणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांनी व व्यक्तींनी परिधान करावा असा सल्ला त्यांना मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी व सर्व संबंधित विभाग / कार्यालय प्रमुख यांनी द्यावा.

**९.** स्थानिक लोक प्रतिनिधी, स्वातंत्र्य सैनिक, शहिद जवानांच्या पत्नींना व आई-वडील यांना समारंभास निमंत्रित करावे. समारंभानंतर संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी सदर समारंभास निमंत्रित केलेल्या मान्यवरांची यादी शासनास तात्काळ सादर करावी.

**१०.** अधिकाधिक नागरिकांना हा सोहळा घरबसल्या पाहता यावा, यासाठी वेबसाईटद्वारे थेट प्रक्षेपण करण्याचा प्रयत्न करावा.

**११.** दिवसभरातून विविध कार्यक्रम जसे :- वृक्षारोपण, आंतर शालेय/आंतर महाविद्यालय स्तरावर वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजूषा/देशभक्तीपर निबंध व कविता स्पर्धांचे आयोजन करावे. प्रभात फेऱ्या काढण्यात याव्यात. सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध खेळांचे आयोजन करण्यात यावे. महत्वाच्या योजनेचा शुभारंभ करावा, शासकीय इमारतीवर विद्युत रोषणाई करावी, एनएसएस व एनवायकेएस द्वारे देशभक्तीपर मोहिम राबविण्यात यावी, तसेच सोशल मिडीया व Digital माध्यमाद्वारे देशभक्तीपर किंवा राष्ट्रीय एकात्मते संबंधातील गाण्यांचा प्रचार करावा/संदेश द्यावा, याप्रमाणे प्रजासत्ताक दिन साजरा करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी.

१२. काही ठराविक जिल्ह्यामध्ये निवडणूक आचारसंहिता अंमलात असल्यास सर्व संबंधितांना यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात याव्यात:-

अ) ध्वजारोहणाच्या नेहमीच्या स्थळामध्ये बदल करण्यात येऊ नये.

ब) कार्यक्रमाचा राजकीय व्यासपीठासारखा वापर करु नये.

क) मा. मंत्री / मा. राज्यमंत्री हे भाषण करणार असल्यास त्यांच्या भाषणाचा आशय ऐतिहासिक मान्यवरांचे कार्य आणि कर्तृत्व, बलिदान केलेल्या हुतात्म्यांचा तसेच देशाचा गौरव यापुरतेच मर्यादित असावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२५०११८२१००५६६३०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DILIP N DESHPANDE

Digitally signed by DILIP N DESHPANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=04b1da429ec9f808e2f142fb8df848a9c440a68828f957571e8bbc53318e3a6f, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=9A444B962C8442B754FC8343183DBEA1519A71F4D0CD0A5CCA8BF9534EF3A0A8, cn=DILIP N DESHPANDE
Date: 2025.01.18 21:10:35 +05'30'

**(दिलीप देशपांडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**<u>तात्काळ</u>**

क्र.सीईआर-२०२५/प्र.क्र.०३/राशि-१,
सामान्य प्रशासन विभाग,
राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १८ जानेवारी, २०२५.

प्रत माहितीसाठी अग्रेषित :-
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग
मा.राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई, (२ प्रती)
मा. राज्यपालांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मुंबई, (२ प्रती)
मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्री ( नगर विकास व गृहनिर्माण) यांचे सचिव
मा. उपमुख्यमंत्री ( राज्य उत्पादन शुल्क, वित्त व नियोजन ) यांचे सचिव
मा. मंत्री (राजशिष्टाचार) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई. (५ प्रती) (पत्राने)
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने)
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने)
प्रबंधक, लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, मुंबई (पत्राने)
फ्लॅग ऑफिसर कमांडिंग इन चीफ, वेस्टर्न नेव्हल कमांड, मुंबई.
जनरल ऑफिसर कमांडिंग, महाराष्ट्र व गुजरात विभाग, मुंबई
एअर ऑफिसर कमांडिंग, हेडक्वॉटर्स, मेरीटाईम एअर ऑपरेशन्स, आयएएफ,आयएएफ बिल्डींग, धोबी तलाव, मुंबई.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
स्टेशन कमांडर, इंडियन एअर फोर्स स्टेशन, मुंबई.
इतर सर्व मंत्रालयीन विभाग, (मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांना कळविण्याच्या विनंतीसह)
केंद्र संचालक, दूरदर्शन, वरळी, मुंबई नं. ४०० ०१८
केंद्र संचालक, आकाशवाणी, मुंबई नागपूर, पुणे, औरंगाबाद.
पोलीस आयुक्त, मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद, ठाणे, सोलापूर, नवी मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी ,
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई.
महानगरपालिका आयुक्त, नागपूर, पुणे, औरंगाबाद, ठाणे, सोलापूर, कोल्हापूर, कल्याण-डोंबिवली, अमरावती, पिंपरी-चिंचवड, नाशिक, नवी मुंबई, उल्हासनगर, नांदेड-वाघाळा, सांगली-मिरज-कुपवाड, अकोला, वसई-विरार, भिवंडी-निजामपूर, मिरा-भाईंदर, अहमदनगर, मालेगाव, जळगाव, धुळे, परभणी शहर, पनवेल, लातूर व चंद्रपूर.
सर्व पोलीस उप महानिरीक्षक, मुंबई
महासमादेशक, नागरी संरक्षण दल, मुंबई
जिल्हाधिकारी, मुंबई, उपनगर जिल्हा

मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा
सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
महालेखापाल-१ महाराष्ट्र, मुंबई (पत्राने)
महालेखापाल-२ महाराष्ट्र, नागपूर (पत्राने)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महासंचालनालय, मुंबई
संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद/उपसभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे खाजगी सचिव
अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा/उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव
विरोधी पक्ष नेते विधानसभा / विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्यमंत्री यांचे जनसंपर्क अधिकारी, मुंबई
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
कार्यकारी अभियंता, इलाका शहर विभाग, बांधकाम भवन, मुंबई
कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग-१, मुंबई
कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग-२,मुंबई
कार्यकारी अभियंता,मध्य मुंबई विद्युत विभाग / दक्षिण मुंबई विद्युत विभाग, मुंबई
संचालक, उपवने व उद्याने, बांधकाम भवन, मुंबई
संचालक, क्रिडा व युवक सेवा सेंट्रल बिल्डींग पुणे.

## प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम, २६ जानेवारी २०२५

### बृहन्मुंबईसाठी

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ५.०० | महत्वाच्या ठिकाणी सनई चौघडा वादन |
| सकाळी | ८.०० | शहरांच्या सर्व भागात, सर्व इमारतींवर, शाळांवर व महाविद्यालयांवर राष्ट्रध्वज उभारण्यात यावेत. |
| *सकाळी | ९.१५ | मा. राज्यपाल महोदय यांच्या हस्ते व मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या उपस्थितीत शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे ध्वजारोहण व समारंभपूर्वक संचलन. |
| *सकाळी | १०.०० | शहरामध्ये जास्तीत जास्त ठिकाणी विविध क्षेत्रातील घटकांचे संचलन करणे, शिक्षण विभागाच्या कक्षेत येणाऱ्या संस्थानी "प्रजासत्ताक महोत्सव" या पुस्तिकेत दिल्याप्रमाणे कार्यक्रम आयोजित करणे, तसेच इतर संस्थानी आपले विविधतापूर्ण देशभक्तीपर व शहीदांच्या स्मृतींसाठी कार्यक्रम आयोजित करावेत. |
| *संध्याकाळी | | सोयीनुसार देशभक्तीपर व शहीदांच्या स्मृतीसाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. |

### विभागीय व जिल्हा मुख्यालयांसाठी

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ८.०० | प्रत्येक भागातील शाळा, महाविद्यालये व इतर जास्तीत जास्त इमारतींवर राष्ट्रध्वज उभारणे. |
| *सकाळी | १०.०० | शहरांच्या जास्तीत जास्त भागाचा अंतर्भाव करुन पोलिस, गृहरक्षक दल, राष्ट्रीय छात्र सेना व रेल्वे सुरक्षा दल यांचे संयुक्त संचलन करणे, शिक्षण विभागाच्या कक्षेत येणाऱ्या संस्थानी "प्रजासत्ताक महोत्सव" या पुस्तिकेत दिल्याप्रमाणे कार्यक्रम आयोजित करणे, तसेच इतर संस्थानी आपले विविधतापूर्ण देशभक्तीपर व शहीदांच्या स्मृतींसाठी कार्यक्रम आयोजित करावेत. |
| *संध्याकाळी | | सोयीनुसार देशभक्तीपर व शहीदांच्या स्मृतीसाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात यावे. |

**ग्रामीण विभागांसाठी**

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ६.०० | गावाची साफ सफाई. |
| सकाळी | ८.०० | चावड्या, सार्वजनिक कार्यालये, दवाखाने, वाचनालये, शाळा, खाजगी इमारत अशा गावातील जास्तीत जास्त ठिकाणी राष्ट्रध्वज उभारण्यात यावेत. |

---

* अशी खूण असलेले कार्यक्रम हे शासकीय समारंभ आहेत. इतर कार्यक्रम प्रजासत्ताक दिन समारंभाच्या नागरीकांच्या समितीने अशासकीय प्रतिनिधिक संस्थांच्या मदतीने करावयाचे कार्यक्रम आहेत.

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)



## परिपत्रक क्रमांक- ०२ /२०२५

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक

**विषय:-** प्रजासत्ताक दिन समारंभ, रविवार दिनांक २६ जानेवारी, २०२५ रोजी साजरा करणेबाबत...
**संदर्भ:-**महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.सीईआर२०२५/प्र.क्र.०३/राशी-१, दि. १८ जानेवारी २०२५.

कृपया वरील संदर्भिय शासन परिपत्रकाचे अवलोकन व्हावे.

दि. २६ जानेवारी, २०२५ रोजी प्रजासत्ताक दिन निमित्त ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी म्हणजे सकाळी ०९.१५ वाजता आयोजित करण्यात येणार आहे. तेव्हा, महाविद्यालयात अथवा संस्थेत ध्वजारोहण समारंभ करतांना त्यांनी तो सकाळी ८.३० वाजेच्या पुर्वी किंवा १०.०० वाजेच्या नंतर आयोजित करावा. तसेच संदर्भिय शासन परिपत्रकातील तंतोतंत पालन करण्यात यावे.

स्थानिक लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्य सैनिक, शहिद जवानांच्या पत्नींना व आई-वडिल यांना या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात यावे. दिवसभरातून विविध कार्यक्रम जसे:- वृक्षारोपण, आंतर शालेय/आंतर महाविद्यालय स्तरावर वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजूषा/देशभक्तीपर निबंध स्पर्धाचे आयोजन करावे. प्रभात फेऱ्या काढण्यात याव्यात. सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध खेळांचे आयोजन करण्यात यावे. महत्वाच्या योजनेचा शुभारंभ करावा, शासकीय इमारतीवर विद्युत रोषणाई करावी, एनएसएस व एनवायकेएस द्वारे देशभक्तीपर मोहिम राबविण्यात यावी, तसेच सोशल मिडिया व डिजिटल माध्यमाद्वारे देशभक्तीपर किंवा राष्ट्रीय एकात्मतेसंबंधातील गाण्यांचा प्रचार करावा/संदेश द्यावा, याप्रमाणे प्रजासत्ताक दिन साजरा करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी.

काही ठराविक जिल्हयांमध्ये निवडणूक आचारसंहिता अंमलात असल्यास संदर्भिय परिपत्रकांतील मुद्दा क्रं. १२ मध्ये दिलेल्या सूचना प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ 1990 'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle) जळगाव-४२५००१

(डॉ. विनोद प्र. पाटील)
**कुलसचिव**

सोबत: महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. सीईआर-२०२५/प्र.क्र.०३/राशी-१, दि. १८ जानेवारी २०२५.

जा.क्र. कबचौउमवि/०३/सा.प्र./०८/२०२५ दि.२०/०१/२०२५
प्रत महितीसाठी :
१) मा. व्यवस्थापन परिषदेचे सर्व सदस्य व अधिष्ठाता, कबचौउमवि, जळगाव, २) मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि, जळगाव, ३) मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि, जळगाव, ४) मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१, ५) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव, ६) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमंडळ, कबचौउमवि, जळगाव, ७) मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगांव

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत, दुरध्वनी क्र : ०२५७ - २२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७ - २२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257 - 2258428, 2258429
Fax No. 0257 - 2258403, 406 Email : registrar@nmu.ac.in Web : www.nmu.ac.in